**प्रेसनोट दि.२६/०६/२०१९**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर**

**सराईत गुन्हेगारास पिस्टलसह दत्तवाडी पोलीसांनी केले अटक.**

दि.२३/०६/२०१९ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पोलीस हवालदार फुलपगारे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "एक इसम त्याचे अंगात काळया रंगाची पॅन्ट व ग्रे रंगाचा चौकोनी नक्षी असलेला फुलबाहयाचा शर्ट घातलेला असून तो रंगाने सावळा व अंगाने सडपातळ असून त्याची उंची अंदाजे ५ फुट आहे. त्याचेकडे देशी बनावटीचे पिस्टल असून, तो ते पिस्टल घेवून जनता वसाहत सांस्कतिक हॉल येथे कोणाची तरी वाट बघत थांबलेला आहे." अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी ही वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांना कळवुन त्यांचे आदेशाने पोलीस उपनिरिक्षक संकपाळ यांनी स्टाफसह पर्वतीपायथा येथील जनता वसाहत सांस्कतिक हॉल येथे जावुन थोडे आडबाजुस थांबुन पाहणी केली असता बातमीत मिळालेल्या वर्णनाचा इसम हा जनता वसाहत सांस्कतिक हॉल येथे थांबलेला दिसल्याने त्यास सोबतचे स्टाफचे मदतीने पोउनि कुलदीप संकपाळ यांनी दिं २३/०६/२०१९ रोजी १६/३० वा. जागीच पकडले. तेव्हा त्यास त्याचे नावे पत्ते विचारता त्याने आपले नाव प्रकाश शरनु बिराजदार वय २५ वर्षे धंदा मजुरी रा. गल्ली नं. ३, जयभवानीनगर जनता वसाहत पर्वती पुणे असे सांगितलेनंतर त्याची झडती घेता त्याचे डावे कमरेला पॅन्टच्या आतमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल किं.रू ३०,०००/- व त्याचे पॅन्टचे डावे खिशात प्लॅस्टिकचे पाऊचमध्ये दोन जिवंत काडतुस किंमत २००/- रुपये मिळून आले. असा एकुण ३२,२००/-रू चा माल मिळून आला असुन त्याचेविरुध्द दत्तवाडी पो. स्टे. येथे गु. र. नं. ३२२/२०१९ भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५), मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे. तसेच सदर हा १) कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं. ७९५/२०१८ भा.द.वि. कलम ३९४, ३४ २) कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं. ८४५/२०१८ भा.द.वि. कलम ३९४ ३) सासवड पोलीस ठाणे गु.र.नं. ६८३/२०१८ भा.द.वि. कलम ३९२, ३४ व ४) राजगड पोलीस ठाणे गु.र.नं. ३५/२०१९ भा.द.वि. कलम ३९४ या गुन्हयांमध्ये पाहीजे आरोपी आहे. तसेच त्यास मा. न्यायालयात हजर करुन त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे व आरोपीकडे अधिक तपास करत आहोत.

तसेच सदरची कारवाई ही मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री कुलदीप संकपाळ, पो. हवा. तानाजी निकम, पो. हवा. रविंद्र फुलपगारे, पो. ना. महेश गाढवे, पो. ना. सोमेश्वर यादव, पो. शि. विकास कदम, पो. शि. सागर सुतकर, पो. शि. शरद राऊत, पो. शि. राहुल ओलेकर व पो. शि. अमोल लोहार यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षक कुलदीप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
दत्तवाडी पो.स्टे.पुणे शहर